# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (सामान्य प्रशासन)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर - ४४०००१

दुरध्वनी : ०७१२-२५२२९९१ फॅक्स : ०७१२-२५५५७०१

क्रमांक : रातुमनावि/साप्र/१६/स/२५९८
दिनांक : १८ नोव्हेंबर २०१७

प्रति,

१. विद्यापीठ शैक्षणिक विभागांचे सर्व विभाग प्रमुख.
२. विद्यापीठ संचालित महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक.
३. विद्यापीठाशी संलग्नित नागपूर शहरातील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य.
४. विद्यापीठ वसतिगृहांचे सर्व अधीक्षक.

विषय : २६ नोव्हेंबर हा दिवस 'संविधान दिन' म्हणून साजरा करण्याबाबत.

महोदय/महोदया,

आपणास कळविण्यात येते की, भारतीय संविधानाबाबत जागरूकता निर्माण व्हावी ह्या दृष्टिने राज्य व केन्द्र शासनाच्या निर्देशानुसार **दिनांक २६ नोव्हेंबर २०१७ रोजी सकाळी १०.०० वाजता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथील प्रांगणात** विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने **संविधान दिनाचा कार्यक्रम** आयोजित करण्यात आला आहे.

प्रस्तुत कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी नागपूर शहरातील सर्व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे व विद्यापीठ वसतिगृहातील विद्यार्थी आपआपल्या महाविद्यालयाचा नामफलक व संविधानातील समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय ह्या जीवन मूल्यांचा पुरस्कार करणारी घोषवाक्य असणारे फलक घेऊन संविधान चौकात (रिजर्व बॅक चौकस्थित डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याजवळ) सकाळी ८.३० वाजता एकत्र येतील व संविधान चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयाला मालार्पण व अभिवादन करून मिरवणुकीद्वारे विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयाच्या प्रांगणात येवून आसनस्थ होतील. याप्रसंगी विद्यापीठाचे मा. कुलगुरू, प्र--कुलगुरू आणि कुलसचिव यांची प्रामुख्याने उपस्थिती राहणार असून त्यांची सविधानावर भाषणे होणार आहेत, त्यानंतर संविधान प्रास्ताविकेचे वाचन होणार आहे.

करिता आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील/विभागातील/वसतिगृहातील **सर्व विद्यार्थ्यांना प्रस्तुत कार्यक्रमास दिनांक २६ नोव्हेंबर २०१७ रोजी सकाळी ८.३० वाजता संविधान चौक** (रिजर्व बॅक चौकस्थित डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याजवळ) **येथे उपस्थित राहण्याबाबत सूचित करावे.**

आपला

(पुरणचंद्र मेश्राम)
कुलसचिव